शनिवार, दि. १४ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १९३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

धन्वंतरी हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत राज्यभर नियंत्रण कक्ष; जिल्हास्तरीय समित्या स्थापन

# घरगुती गॅस सिलेंडर मुबलक प्रमाणात उपलब्ध

## समाजमाध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवर कारवाई; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी -** इराण - इस्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल.

मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) समन्वय साधणार आहेत.

पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.

अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने

रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, शासकीय शाळा/महाविद्यालयांमधील मेस, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना घरगुती/व्यावसायिक गॅसचा पान २ वर

# जालना शहरात पुरवठा विभागाची मोठी कारवाई

## व्यवसायिक कारणांसाठी वापरले जाणारे ३० घरगुती गॅस सिलेंडर जप्त;

**जालना । प्रतिनिधी -** आज दिनांक १३ शुक्रवार रोजी सायंकाळी सहा वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरात पुरवठा विभागाने मोठी कारवाई केली आहे. व्यवसायिक कारणांसाठी वापरले जाणारे ३० घरगुती गॅस सिलेंडर जालना तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने जप्त केले आहेत. जालना शहरात पुरवठा विभागाने अवैध गॅस वापराविरोधात अचानक विशेष मोहीम राबवली.

सदरील कारवाई उपविभागिय अधिकारी रामदास दौंड, तहसीलदार छाया पवार,तालूका पुरवठा अधिकारी प्रकाश जाधव, पुरवठा निरिक्षक दिपक दंडाईत, प्रियंका टाशे, दिलीप मुळे ई. अधिकाऱ्यांनी कारवाई केली आहे.

या मोहिमेदरम्यान शहरातील अंबड चौफुली, छत्रपती संभाजीनगर चौफुली आणि भोकरदन नाका चौकात विविध हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांची अचानक तपासणी करण्यात आली. या तपासणीत अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन करून स्वस्त दरातील घरगुती गॅस सिलेंडरचा वापर व्यावसायिक कारणांसाठी होत असल्याचे आढळून आले. त्यानुसार, बेकायदेशीररित्या वापरले जात असलेले



३० घरगुती गॅस सिलेंडर पुरवठा विभागाने जप्त केले आहेत. जप्त केलेले सिलेंडर अधिकृत गॅस एजन्सीच्या ताब्यात देण्यात येणार असून संबंधित व्यावसायिकांवर पोलीस ठाण्यांमध्ये कायदेशीर फौजदारी कारवाई करून गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, नागरिकांनी व्यावसायिक कारणांसाठी घरगुती गॅस सिलेंडरचा वापर करू नये, अन्यथा कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा जालन्याचे उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांनी दिला आहे.

### मूळ साखळीवर कारवाई झाली तरच अवैध वापराला लगाम

पुरवठा विभागाने व्यवसायिक वापरासाठी वापरले जाणारे घरगुती गॅस सिलेंडर जप्त करून केलेली कारवाई निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, असे सिलेंडर व्यवसायिकांपर्यंत पोहोचतात कसे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. गॅस एजन्सीच्या वितरण साखळीतूनच हे सिलेंडर काही ठिकाणी वळवले जात असल्याची चर्चा वारंवार समोर येते. त्यामुळे केवळ सिलेंडर जप्त करून कारवाई मर्यादित न ठेवता ते व्यवसायिकांकडे पोहोचविणाऱ्या एजन्सी धारकांवर आणि वितरण करणाऱ्या व्यक्तींवरही कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. अन्यथा अशा मोहिमा राबवल्यानंतर काही दिवसांनी परिस्थिती पुन्हा जैसे थे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

युवा आदर्श

**नाहक ...**

आधि पेक्षा अधिक
युध्द बने विनाशक
नायनाटकरे शत्रुंचा
हिंस्त्र झाले शासक
एआय तंत्र निर्मित
हल्ले घडवी दाहक
शहरे होती उध्वस्त
निष्पापबळी नाहक
मोहात पाडते सर्वांस
सत्ता हव्यास मादक
शस्त्रांस्त्रा पेक्षा जादा
ईर्षा इच्छा ती भेदक
अणूचा विध्वंस वापर
अस्वस्थ हो संशोधक
उलटे पाऊल प्रगतिचे
मानवी हक्का बाधक
शिकारीसाठी उत्सुक
टपून बसला लुब्धक
आपले बाजू अधिक
बनवावे गुलाम बंधक
दोन महायुध्दे आठव
इतिहास तो उद्बोधक
सुजाण बना शिक्षिता
विश्व शांतीचे साधक

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# मनपा विषय समित्यांसाठी भाजपा उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या विषय समित्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम पीठासन अधिकारी श्री.मिसाळ साहेब यांनी दि.११.०३.२०२६ रोजी जाहीर केला त्यानुसार दि.१२.०३.२०२६ रोजी फॉर्म विक्री करण्यात आली व आज दि.१३.०३.२०२६ रोजी सर्व विषय समित्यांचे सभापती व उपसभापती पदाचे नामनिर्देशन आज दुपारी ३.०० वाजेपर्यंत दाखल करणे, भारतीय जनता पार्टी च्या वतीने महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदासाठी अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहर पांगारकर यांचा तसेच महिला व बालकल्याण सभापती पदाकरिता सौ.संध्या संजय देठे, उपसभापती पदाकरिता सौ.पद्मा अजित मानधनी.

स्वच्छता व आरोग्य समिती समितीवर सभापती पदासाठी श्री. कपिल श्रावण भूरेवाल व उपसभापती पदासाठी सौ.अनामिका विजय पांगारकर, बांधकाम समिती सभापती पदाकरिता सौ.माया मनोज जोशी व उपसभापती पदाकरिता सौ.ऐश्वर्या अशोक आडेकर शिक्षण व विद्युत सभापती पदासाठी सौ. भाग्यश्री सुजितकुमार जोगस व उपसभापती पदासाठी सौ. कार्तिकी मनोज इंगळे, पाणीपुरवठा व जलनिस्सारण सभापती पदाकरिता सौ. पूनम राजेश स्वामी व उपसभापती पदासाठी सौ. अनिता मोहन खोडवे यांचे नामनिर्देशन दाखल करण्यात आले. दि.१७.०३.२०२६ रोजी सदरील नामनिर्देशन पात्रांची छाननी होऊन विजय झालेल्या सर्व उमेदवारांची घोषणा होणार आहे.

सदरील नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळी महापौर श्रीमती वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, भाजपा सभागृह गटनेते महेश निकम, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, देविदास



देशमुख, राजेश जोशी, सुजित जोगस, शिवराज जाधव, शिवाजी वेताळ, रणजीत मगरे, राजेश बाबरेकर, विजय पांगारकर, धिरज मेवाडे, बापू साळवे, अशोक आडेकर, मनोज इंगळे, लक्ष्मण गोर्डे, प्रतिक पांगारकर, मनोज जोशी, अमित मानधनी, रवि सले, नारायण पवार इत्यादीसह सर्व उमेदवार व नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १७ ते २० मार्च दरम्यान राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता

## शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे

**मुंबई,** - येत्या १७ ते २० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील नाकारता येत नाही. सध्याच्या अंदाजानुसार १८ ते २० मार्च दरम्यान या हवामान घडामोडींची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची

काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

जालना महानगरपालिकेची मोठी कारवाई

# दोन कंपन्या सील, ७१ लाखांहून अधिक कर वसुली

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेने मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या धारकांविरुद्ध जप्तीची कठोर मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत आज, १४ मार्च २०२६ रोजी नवीन एम.आय.डी.सी. आणि नवीन मोंढा भागात विशेष पथकाद्वारे कारवाई करण्यात आली. यामध्ये दोन औद्योगिक कंपन्या सील करण्यात आल्या असून एकाच दिवसात ७१,४५,००० रुपयांची वसुली करण्यात आली आहे.



थकबाकीमुळे कंपन्यांना ठोकले टाळे महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार, न्यू एम.आय.डी.सी. भागातील बालाजी इंडस्ट्रीज आणि साई बोटलिंग या दोन कंपन्यांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे. या कंपन्यांकडे ५,३०,२०६ रुपये (अक्षरी पाच लाख तीस हजार दोनशे सहा फक्त) इतकी कराची रक्कम थकलेली होती. वारंवार नोटिसा देऊनही कराचा भरणा न केल्याने ही कारवाई करण्यात आली.

**महत्त्वाच्या संस्थांकडून कर भरणा**

जप्तीची कारवाई सुरू असतानाच अनेक मोठ्या संस्था आणि उद्योगांनी आपला थकीत कर भरला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील नावांचा समावेश आहे:

एम.आय.डी.सी. भाग: पोलाद भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल प्रा.ली., आदिनाथ कनिष्ट, गीताई इंडस्ट्रीज, कालिका स्टील आणि सम्राट गॅस.

नवीन मोंढा भाग: सुंदरलाल सावजी को. ऑप. बँक, जालना मर्चंट को. ऑप. बँक आणि पान २ वर

संपादकीय पान

# ग्राहक संरक्षण कायदा आणि ग्राहक

## आधुनिक काळातील विज्ञानसूर्य

आधुनिक काळातील विज्ञानसूर्य म्हणून ओळखले जाणारे प्रख्यात शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांचा आज स्मृतिदिन. ६ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १४ मार्च २०१८ रोजी त्यांचे निधन झाले. स्टीफन हॉकिंग यांचा जन्म ८ जानेवारी १९४२ साली इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथे झाला. त्यांचे वडील डॉ. फ्रँक हॉकिंग जीवशास्त्राचे संशोधक होते. स्टीफन हॉकिंग यांच्या जन्माच्या वेळी डॉ. फ्रँक आणि इसाबेल या दाम्पत्याने उत्तर लंडनहून ऑक्सफर्ड येथे स्थलांतर केले, कारण तेंव्हा दुसरे महायुद्ध चालू होते. पण काही दिवसांतच ते पुन्हा लंडनला परतले कारण त्यांचे वडील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिसिनमध्ये पार्सिटोलॉजी विभागाचे प्रमुख बनले होते. १९५० मध्ये हॉकिंग कुटुंबाने सेंट अल्बान्स येथे स्थलांतर केले. येथेच १९५० ते १०५३ अशी तीन वर्ष त्यांनी सेंट अल्बान्स स्कुल फॉर गर्ल्स या शाळेत शिक्षण घेतले. ही शाळा मुलींची असली तरी तिथे मुलांनाही प्रवेश दिला जात होता. स्टीफन लहानपणापासून हुशार होते. त्यांना गणित, भौतिकशास्त्र आणि संगीताची खूप आवड होती. स्टीफन हॉकिंग यांनी ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात विश्व उत्पत्ती शास्त्राचे संशोधन करण्यासाठी प्रवेश घेतला, पण अवघ्या २१ व्या वर्षी अमायो ट्रॉपिक लॅटरल स्क्लोरोसिस (एएलएस ) या असाध्य रोगाने त्यांना ग्रासले. स्टीफन हॉकिंग जेमतेम दोन वर्ष जगतील असे त्यांना सांगण्यात आले. आधी ते खूप निराश झाले पण त्याच इस्पितळातील एका रोग्याला पाहून त्यांना आशेचा किरण दिसू लागला. या आजाराने त्यांना बहुविकलांगत्व आले. चालण्याफिरण्यासाठी त्यांना व्हीलचेअरचा आधार घ्यावा लागला. मग व्हील चेअरवर एक संगणक जोडण्यात आला. फक्त एक बोट वापरुन ते संगणकावर काम करू लागले. १९८५ साली त्यांना न्यूमोनिया झाला. त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात आली या शस्त्रक्रियेनंतर त्यांचा आवाजही गेला पण त्यांनी हार मानली नाही. दुर्दम्य इच्छाशक्ती, सकारात्मकता, कार्यमग्नता आणि जीवनाविषयीचे प्रेम या गुणांच्या जोरावर त्यांनी दुर्धर आजारावर मात करीत कृष्णविवरासंदर्भात अनेक संशोधन करुन जगाला अचंबित केले. कृष्णविवरासंदर्भात त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यांच्या ब्रिफ हिस्ट्री ऑफ टाईम या पुस्तकाने अनेक विक्रम केले. या पुस्तकावर आधारित अनेक मालिका व चित्रपट निघाले. रॉजर पेनरोज या सहकाऱ्याच्या मदतीने त्यांनी सापेक्षतेवादाच्या सिद्धांतावर आधारित अवकाश व काळाची सुरवात बिगबँगमध्ये झाली असेल तर कृष्णविवरात शेवट असेल असा सिद्धांत मांडला. कृष्णविवरे काळी नसतात. कृष्णविवरे उत्सर्जन करतात. ब्रह्मांडाला कोणतीही सीमा नाही असे सिद्धांत त्यांनी मांडले. त्यांची अनेक संशोधने ही काळाच्या पुढची होती. म्हणून त्यांना आधुनिक काळातील न्यूटन असे म्हणतात. स्टीफन हॉकिंग यांचे जीवनचरित्र प्रेरणादायी व स्तिमित करणारे आहे. काळाच्या पुढे असणारा हा शास्त्रज्ञ आधुनिक काळात होऊन गेला, ही गोष्टच पुढील पिढीला स्तिमित करणारी ठरेल. स्टीफन हॉकिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

कस्टमर ईज किंग (ग्राहक राजा आहे.),किंवा कस्टमर ईज गॉंड. (ग्राहक देवआहे) अशी विशेषण ग्राहकाला लावली जातात.आणि दुसरीकडे अनेक प्रलोभन दाखवून ग्राहकांना आपल्या मालाचे,वस्तूंच्या खपासाठी आकर्षित केले जाते,आणि जाळ्यात ओढले जाते.आणि बऱ्याचदा अशा प्रलोभनांना ग्राहक बळी प।।।तो. त्यातच त्याची फसवणूक केली जाते. पॅन्ट वर शर्ट मिळणार अगदी फुकट .साडीवर साडी मिळणार अगदी फ ुकट.बाय वन गेट वन,एक वस्तू खरेदी केली तर एक फुकट,तर कधी विशिष्ट रकमेचा माल खरेदी केला तर कुपन मिळेल, त्याची सोडत निघणार त्यात हमखास बक्षिस मिळणारच. सोने खरेदीवर चांदीचे नाणे,किंवा गिफ्ट मिळणार, फ्लॅट खरेदीवर टू व्हीलर मिळवा,अश्या जाहिराती मोठ्या प्रमाणावर केल्या जातात आणि त्यालाच तुम्ही आम्ही भुलतो,आणि फसवणूक होते.

आज आपण बाजारपेठेत नजर टाकली तर जिकडे तिकडे आपल्याला मालाच्या जाहिरातीच जाहिराती बघायला मिळतात. कुठे मोठ्या प्रमाणावर अनेक वस्तूंचा सेल लागलेला असतो आणि त्यासोबत बक्षिसेही दिली जातात. एकूणच सध्याचा काळ हा स्पर्धेचा आहे, तसा जाहिरातीचाही आहे. जो तोआपला उत्पादित माल बाजार पेठेत कसा जास्त विक्री होईल या प्रयत्नात असतो. वर्तमानपत्राची बरीच पाने जाहिरातीने व्यापलेली असतात.

ग्राहक दिन साजरा करण्या मागचा उद्देश बघितला तर ग्राहकाची फसवणूक होवू नये,सेवा पुरवताना हलगर्जीपणा होवू नये म्हणून ग्राहकाला ग्राहक कायद्याची माहीती करुन द्यावी हाच मुळ उद्देश आहे.

१९६० मध्ये अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीत ग्राहक चळवळीचा मुद्दा उपस्थित झाला होता.अध्यक्ष केनेडी यांनी ग्राहकांच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी एक व्यासपीठ तयार केल. जागतिक पातळीवर पाठपुरावा केला गेला,त्याला युनेस्को कडून मान्यता मिळाली.आणि तदनंतर दरवर्षी १५ मार्च हा दिवस, ''जागतिक ग्राहक दिन'' म्हणून साजरा करण्याची प्रथा आहे.सर्वत्र तो साजरा केला जातो.

आपल्या देशात २४ डिसेंबर १९८६ मध्ये राष्ट्रपतींनी ग्राहक हक्क संरक्षण कायद्याला मंजुरी दिली. तेव्हा पासून ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. व २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकास सहा प्रकारचे हक्क प्राप्त झाले आहेत. प्रत्येक ग्राहकास आपले हक्क माहीत असतील तर त्याची फसवणूक होणार नाही.

काय आहे हे हक्क?

१) सुरक्षेचा हक्कः- एखादी वस्तू खरेदी करतो,तेव्हा त्या वस्तूच्या सुरक्षिततेची हमी उत्पादकानी घेणे आवश्यक असते.जसे फ्रीज.टी.व्ही. वॉशिंग मशिन.मोटर बाईक,कार, फ्लॅट, कुठल्याही वस्तू.

२) माहितीचा हक्कः-आपण खरेदी करत असलेल्या वस्तूंच्या गुणवत्ते बद्दल माहिती विक्रेत्याने ग्रहकांना देणे बंधनकारक आहे.त्यात फसवणूक करु नये.

३) निवड करण्याचा हक्कः- विक्रेता एकाच प्रकारचे उत्पादन, वा ब्रॅन्डचा आग्रह करु शकत नाही. निवडीचा अधिकार ग्राहकांना आहे.

४) म्हणणं मांडण्याचा हक्कः- ग्राहकाला आपली फसवणूक झाली वाटत असेल तर आपले म्हणणे,योग्य न्यायासाठी मांडण्याचा हक्क आहे.

५) तक्रार करण्याचा, तसेच तिचे निवारण्यासाठीचा हक्कः- फसवणूक झाली असेल तर,न्यायासाठी तक्रार




निवारण करुन घेण्यासाठी ग्राहक मंच,राज्य ग्राहक परिषदेत जाण्याचा हक्क आहे.

६) ग्राहकांचे हक्का विषयी शिक्षणाचा अधिकार. हक्कः- ग्राहकांना हक्क कर्तव्ये माहिती नसल्यामुळे बाजारपेठेत फसवणूक होते,ते समजण्यासाठी स्वयंसेवी संस्था, शासनाचे कडून जागो ग्राहक जागो सारखे उपक्रमा द्वारे प्रबोधन केले जाते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वैद्यकीय सेवा या ''सेवेच्या'' व्याख्येत येतात आणि डॉक्टरांना ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत जबाबदार धरले जाऊ शकते.

सुधारित ग्राहक संरक्षण विधेयक ३० जुलै २०१९ लोकसभेत व सहा ऑगस्ट २०१९ राज्यसभेत मंजूर झाले.

९ ऑगस्ट रोजी राष्ट्रपतींची सही झाल्यावर २० जुलै रोजी ते लागू झाले, आता जिल्हा आयोग व राज्य आयोग अशी रचना आहे. जिल्ह्यात एक कोटी पर्यंत, राज्य दहा कोटी पर्यंत, व त्यावरील केंद्रीय आयोगाकडे दावे असतील. नवीन कायद्यात ऑनलाइन व टेलीशॉपिंग कंपन्यांचा समावेश आहे. खाद्यपदार्थ व पेय यात भेसळ असल्यास तुरुंगवास दंडाची तरतूद आहे. तक्रार कुठेही दाखल करता येते. दिशाभूल करणाऱ्या चुकीच्या जाहिराती देणारे आणि प्रसारीत करणाऱ्यांना दंड करण्याचा आयोगाला अधिकार आहे. दोन वर्षे तुरुंगवास व पन्नास लाख दंडाची तरतूद आहे.

ग्राहकांची फसवणूक झाली असेल तर त्याला न्याय हा मिळतोच, पण आपल्या हक्का सोबतच काही कर्तव्ये आहेत याची जाणीव सुद्धा ग्राहकांनी ठेवायला हवी.

काय आहे ती कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या?

कर्तव्ये आणि जबाबदारी

बाजारपेठेत एका उत्पादनासाठी अनेक उत्पादक असतात.त्यात स्पर्धा ही असणारच. फसव्या जाहिरातीला ग्राहकाने बळी पडू नये.

बऱ्याचदा धमाका सेल ऑनलाईन खरेदीवर असतात,सणवारालाही डिस्काउंट सेल असतात,अशा वेळी न खपलेला,किंवा काही दोष असलेला माल असू शकतो.सावधपणे खरेदी करावी.

खरेदी करतांना मालाचे बिल आवश्यक आहे.बिलाचा आग्रह धरावा.न दिल्यास विक्रेत्याची तक्रार करावी.कारण माल दोषयुक्त असेल तर बिलाशिवाय आपण काहीच करु शकत नाही.

एम.आर.पी.(मॅक्झीमम रिटेल प्राईज) पेक्षा जास्त किंमत देऊ नका. खरेदी करतांना ती बघा.

वस्तूंची मुदत तपासा.(एक्सपायरी डेट) ती संपली असेल तर वस्तू नाकारावी.अशा वस्तूचा वापर हानिकारक ठरु शकतो.

पेट्रोल भरतांना मीटरवर शून्या कडे लक्ष द्या.शुध्दते विषयी शंका असल्यास पुरवठा निरीक्षक,तहसीलदार यांचेकडे तक्रार करा.

सोने खरेदी वेळी हॉलमार्क कडे लक्ष द्या.

ऑनलाईन खाद्य पदार्थ मागवताना योग्य काळजी घ्या.पदार्थ खराब आढळून आल्यास ताबडतोब तक्रार करावी.

ग्राहकांना योग्य तो न्याय मिळावा म्हणून जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहकआयोग व राज्य पातळीवर राज्य ग्राहक आयोग कार्यरत आहेत. विनाशुल्क आपण तक्रार दाखल करु शकतो. केन्द्रात राष्ट्रीय ग्राहक आयोग आहे. तर राज्यातील दुर्गम भागात ग्राहक उपाययोजनांसाठी ग्राहक कल्याण सल्लागार समिती आहे. याव्यतिरिक्त जागो ग्राहक जागो व कंझुमर क्लब आहेत.

गावपातळीवर ग्राहकांसाठी ग्राहक सेवा संस्था, ग्राहक पंचायत,प्रवासी संघ,कार्यान्वित आहेत.ग्राहकांवर अन्याय होऊ नये म्हणून त्या कार्य करतात.प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक तक्रार निवारण समिती आहे.या समितीत विविध विभागातील सदस्यांची निवड केली जाते.शासकिय सदस्य + अशासकिय सदस्य असतात.

काही वर्षांपासून शासनात ग्राहक संरक्षण विभागाची निर्मिती केली आहे.त्यासाठी स्वतंत्रपणे मंत्र्याची नेमणूक केली जाते.

शहरी,ग्रामीण भागात ग्राहकाचे हक्का रक्षण होणे त्याला न्याय मिळवून देण्यासाठी व्यवस्था असली तरी

ग्राहकास खूप काळ न्यायासाठी ताटकळत बसावे लागते.अनेक ठिकाणी जिल्हा ग्रा.मंचावर अध्यक्ष नसतात.त्यांच्या नेमणूका लवकर होत नाही, तर कधी मंचाचे सदस्य नसतात. नव्वद दिवसांत न्याय मिळण्याचा हेतू साध्य होत नाही.शासनाचे दुर्लक्षच म्हणावे लागेल.

ग्राहकांच्या वाढत्या फसवणूकिचे प्रकाराला आळा बसावा म्हणून केन्द्र सरकारने ''जागो ग्राहक जागो''अभियान सुरु केले आहे.बँका,सार्वजनिक वितरण, वीज,बांधकाम, अन्नौषध, पर्यटन, पोस्ट,अशा विविध प्रकारच्या खात्याच्या तक्रारी ह्या अभियानाच्या हेल्पलाइन(मदत सेवा प्रणाली) वर ग्राहक करु शकतो.

जागतिक ग्राहक दिन,राष्ट्रीय ग्राहक दिनाचे शासकिय पातळीवरून आयोजन केले जाते. त्यात औपचारिकता असते.काहीच ठिकाणचे अपवाद सोडले तर बहुतांशी उदासीनता असते.कार्यक्रमा संबंधित प्रसार, प्रचार व्हावा तो होत नाही. ठरावीकच लोकांना पत्रिका वाटून कार्यक्रम होतात. ज्यांना पत्रिका जातात ते कोणिही कार्यक्रमात नसतात.ही सत्यता आहे.कार्यक्रमास ग्राहकांची उपस्थिती चा अभाव असतो. बऱ्याचदा तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी, वेंडर, स्वस्तधान्य दुकानदार हेच उपस्थित असतात.दहापंधरा लोकांच्या उपस्थितीत कार्यक्रम उरकून घेतला जातो. फोटो प्रसिद्ध होतात. आत्मियतेने आयोजन अपेक्षित आहे ते केले जात नाही.

वास्तविक अशा कार्यक्रमात, वेगवेगळ्या खात्याचे अधिकारी, गॅस एजन्सी, वजनमापांबाबत अधिकारी उपस्थिती हवी.ग्राहकांना ग्राहक संरक्षण कायदा समजवून सांगायला हवा ते होत नाही.कार्यक्रमात ग्राहकांची उपस्थिती वाढणे साठी प्रयत्न होत नाही.सालाबाद प्रमाणे कार्यक्रम साजरा करुन, वर्तमानपत्रात वृत्त प्रसिद्ध होते.यापलीकडे काही साध्य होत नाही.ते आपण दरवर्षी पहातोच. कार्यक्रम त्यांच्या पद्धतीने साजरे होतात. वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळते, त्यावर प्रतिक्रिया येतात, जैसे थे सुधारणा मात्र नाही.

शासनाने या बाबतीत योग्य ती दखल घेणे आवश्यक आहे. व त्यात सुधारणा घडवून आणायला हवी हे मात्र नक्कीच.

शेवटी एकच म्हणावे लागेल. कायद्याने ग्राहकांना हक्क, अधिकार दिले आहेत.ग्राहक म्हणून त्याचा कसा वापर करायचा ते आपणच ठरवायचे आहे.कारण...ग्राहक शक्ति + न्याय शक्ति + दंड शक्ती = शोषण मुक्ती हेच समीकरण आहे.न्याय मिळवण्यासाठी न घाबरता तक्रार करायलाच हवी.

ग्राहकाने त्यास दिलेल्या हक्काचा योग्य वापर करुन, आपली कर्तव्ये लक्षात ठेवून बाजारपेठेत जागृत राहून खरेदी करणेही अपेक्षित आहे,जेणे करुन तो फसवणुकीतून वाचू शकेल.

थोडक्यात राष्ट्रीय ग्राहक दिन,जागतिक ग्राहक दिन केवळ औपचारिकरित्या साजरे करून चालणार नाही, तर व्यापक प्रमाणावर ग्राहकचळवळ उभी राहाणे आवश्यक आहे.



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मोबा.८९९९५६६९१७**

पान १ वरुन

## घरगुती गॅस ...

पुरवठा प्राधान्याने देण्यात येणार असून अशा संस्थांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने देण्यासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रमही निश्चित केला जाणार आहे.

गॅस पुरवठ्याबाबत अफवा पसरू नयेत, यासाठी दररोज रेडिओ, एफएम, दूरदर्शन तसेच मुद्रित माध्यमांद्वारे माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि जिल्हा समित्या यांसंदर्भातील जबाबदारी पार पाडतील समाज माध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवरही कारवाई करण्यात येणार आहे.

गॅस बुकींग ॲप आणि मिस्ड कॉल सेवांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्देश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करून तक्रार निवारणासाठी व्हॉट्सॲप सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आगामी धार्मिक सण व उत्सवांचा विचार करून सार्वजनिक संस्थांना एलपीजी सिलिंडरचा पुरवठा अखंड ठेवण्यासाठी प्राधान्य राहील.

गॅस सिलिंडर पुरवठ्या संदर्भात नागरिकांमध्ये घबराट निर्माण होऊ नये, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत सदस्यांची मदत घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. एलपीजी वाहतूक करणाऱ्या वाहनांना तसेच गॅस एजन्सींना आवश्यक पोलीस संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनावर सोपविण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासन, रेशनिंग नियंत्रक आणि तेल कंपन्यांनी दररोज साठा स्थिती व अद्ययावत अहवाल राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही

महाराष्ट्र राज्यात दररोज सरासरी सुमारे ९,००० मेट्रिक टन एलपीजी ची मागणी असते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी रिफायनरीमधील एलपीजी उत्पादन वाढविण्यात आले असून, गेल्या दोन दिवसांत दैनिक उत्पादन ९,००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यात घरगुती एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅसची मागणी पूर्ण करण्याइतके पुरेसे उत्पादन आणि साठा उपलब्ध आहे.

व्यावसायिक एलपीजीच्या बाबतीत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार रुग्णालये, शाळांमधील मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा, सामुदायिक स्वयंपाकगृहे (कम्युनिटी किचन), तसेच शासकीय शाळा व महाविद्यालयांच्या मेस यांसारख्या अत्यावश्यक सेवांना प्राधान्य देण्यात येत आहे. उपलब्ध उत्पादनातून या सर्व गरजा पूर्ण होऊ शकतात.

घरगुती वापरासाठीच्या पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) चा देखील पुरेसा साठा उपलब्ध आहे. इंधनाच्या बाबतीतही राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यातील रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून दररोज सुमारे १५,००० किलो लिटर पेट्रोल आणि ३८,००० किलो लिटर डिझेल या मागणीची पूर्तता केली जात आहे. त्यामुळे इंधन पुरवठ्याबाबत नागरिकांनी काळजी करू नये असे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

## दोन कंपन्या ...

मुनीम लाईन भागातील काही मालमत्ता धारक.

**प्रशासनाचा इशारा**

ही कारवाई महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त श्री. अर्जुन गिराम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, यापुढेही दररोज जप्तीची कारवाई सुरू राहणार असून मोठ्या थकबाकीदारांची नावे वर्तमानपत्रे व सोशल मीडियावर प्रसिद्ध केली जातील. तसेच, वेळेत कर न भरणाऱ्यांवर अधिकचे व्याज आणि शास्ती (दंड) लादली जाणार आहे.

जप्तीची नामुष्की टाळण्यासाठी थकबाकीदारांनी तातडीने आपल्या कराचा भरणा करावा, असे आवाहन कर अधिकारी राहुल देशमुख आणि महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# मानवी जीवनात मातृभाषेचे योगदान अतुलनीय! - देवेंद्र भुजबळ

धर्माच्या नावाखाली भारताची फाळणी होऊन पाकिस्तान अस्तित्वात आले. पण त्याच पाकिस्तानची फाळणी

भाषेच्या आधारावर होऊन बांगला देश अस्तित्वात आला. यावरुन मानवी जीवनात मातृभाषेचे महत्व किती आहे हे स्पष्ट होते, असे प्रतिपादन निवृत्त माहिती संचालक श्री देवेंद्र भुजबळ यांनी केले.ठाणे येथील जोशी बेडेकर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

श्री भुजबळ पुढे म्हणाले की, २१ फ ेब्रुवारी १९५२ रोजी ढाका विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या बंगाली मातृभाषेला उर्दू भाषेबरोबरच

राज भाषेचा दर्जा मिळावा म्हणून आंदोलन केले होते. या आंदोलक विद्यार्थ्यांवर केलेल्या गोळीबारात पाच विद्यार्थी ठार झाले होते. तेव्हापासून बांगला देशाच्या स्वातंत्र्य लढ्याने गती पकडून अखेर १९७१ साली

बांगला देश स्वतंत्र झाला. युनेस्कोने मातृभाषेचे महत्व ओळखून २००० सालापासून

२१ फेब्रुवारी हा जागतिक मातृभाषा दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. तर

महाराष्ट्र शासनाने देखील मातृभाषा मराठीला यथोचित गौरव प्राप्त व्हावा यासाठी आयुष्य वेचणाऱ्या जेष्ठ साहित्यिक, नाटककार वि वा शिरवाडकर ऊर्फ कवी कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून २०१३ सालापासून साजरा करण्यास सुरुवात केली. अर्थात आपल्या मातृभाषेचा अभिमान म्हणजे अन्य भाषांचा दुस्वास करणे असे नसून बहु भाषिक होण्यानेच

आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी श्री भुजबळ यांच्या हस्ते काही गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

प्रारंभी पारंपरिक मराठी वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी पालखीत विसावलेल्या माऊलीला खांद्यावर घेऊन ग्रंथ दिंडी काढली. लाभले आम्हास भाग्य, अभिजात मराठी भाषेचा जयजयकार असो अश्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. नंतर सुरू झाला गायन, नृत्य, नाट्य ह्यांचा आविष्कार. बासरीच्या मधुर स्वरांनी कार्यक्रमाला सुरवात झाली. पारंपारिक कोळी नृत्य, लावणी, भारुड, अभंगरूपात नृत्य अश्या अनेक कलाकृती सादर केल्या गेल्या . छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा संध्यानी जाधव हिने सादर केला आणि त्यावर नाट्य सादरीकरण करण्यात आले. ज्याला प्रचंड प्रतिसाद लाभला.

ह्यावेळी मराठमोळी संस्कृती, लोककला यांचे २१ कला प्रकार सादर करण्यात आले. ह्या सर्व सादरीकरणाना उस्फूर्तपणे दाद मिळत होती. सर्व कला प्रकारांना दीपेश पाटील आणि मंडळींनी उत्तम साथ संगत केली.

यश बंदरकर या विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या प्रांगणात सुंदर अशी मराठी भाषा गौरव दिनाची रांगोळी रेखाटली होती. अनिरुद्ध नाईक यांनी सुंदर देखावे सादर केले.

समिधा पाटील आणि आश्लेषा माने ह्यांनी उत्तम निवेदन केले. प्रा. रूपेश महाडिक ह्यांनी आभार प्रदर्शन केले. ह्या कार्यक्रमासाठी उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर , उपप्राचार्य डॉ. महेश पाटील ह्यांची उपस्थिती लाभली होती.

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि मराठी भाषा आणि साहित्य विभाग प्रमुख डॉ.संतोष राणे ह्यांच्या सहकार्याने झाले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन प्रा. रूपेश महाडिक आणि प्रा. राजश्री माने ह्यांनी केले. मराठी विभागाच्या अनेक विद्यार्थ्यांचे सहकार्य ह्या कार्यक्रमाला लाभले.

# तृतीयपंथीयांच्या हक्क व कल्याण योजनांबाबत मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व त्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी जालना येथे विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने आयोजित या कार्यशाळेत तृतीयपंथीय नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा मिळवता येईल याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यात तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्याअंतर्गत जिल्हास्तरावर तृतीयपंथीयांच्या समस्या व तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील तृतीयपंथीय नागरिकांना शासनाच्या योजना व सुविधा समजावून सांगण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना येथे आयोजित या कार्यशाळेस अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षेत व तृतीयपंथीयांचे गुरु तथा संस्थापक अध्यक्ष मोहम्मद शफीक बक्श (कालम गुरु नानी) यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. यावेळी जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी, आरोग्य विभागाचे प्रतिनिधी तसेच समाजकल्याण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यशाळेत तृतीयपंथीय नागरिकांना शिक्षण, आरोग्य, रोजगार, कौशल्य विकास, सामाजिक सुरक्षा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याबाबत माहिती देण्यात आली. यासोबतच आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, शासकीय कागदपत्रे, आरोग्य सेवा तसेच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींबाबतही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेत जिल्हा शल्य चिकीत्सक, जालना, व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परीषद जालना आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी, जालना यांच्या मार्फत आरोग्य तपासणी तसेच क्षयरोग तपासाणी शिबिरांचे आयोजन करुन आरोग्य विषयक मार्गदर्शन



करण्यात आले, सहायक आयुक्त,रोजगार व कौशल्य विकास कार्यालयामार्फत आर्थिक उन्तिषकरीता रोजगारबाबत मार्गदर्शन करण्यात आले, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना यांच्या मार्फत कायदेविषक सल्ला मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा पुरवठा कार्यालयामार्फत रेशन कार्ड देणे व अन्नधान्य पुरवठा करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी (निवडणुक) जालना यांच्याकडुन निवडणुक ओळखपत्र देणेबाबात. महसुल विभागामार्फत घरकुल बांधकामाकरीता व सश्मानभुमी (दफनभुमी) करीता जमीन उपलब्ध करुन देणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद तसेच इतर संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी तृतीयपंथीयांसाठी उपलब्ध असलेल्या योजना व सुविधांची माहिती दिली. यावेळी उपस्थित तृतीयपंथीय नागरिकांच्या समस्या, अडचणी आणि सूचनाही यावेळी जाणून घेण्यात आल्या.

या कार्यशाळेस जालना जिल्हातील तृतीयपंथीय नागरीकांना मार्गदर्शन करणेकरीता अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, तृतीयपंथीयांचे गुरु तथा संस्थापक अध्यक्ष मोहम्मद शफीक बक्श् (काजल गुरु नानी), प्रविण पाखरे, साक्षी उगले, जिल्हा कौशल्य अधिकारी भुंजग रेठे, क्षयरोग अधिकारी डॉ.गोपाल कुडलीकर, वैद्यकिय अधिकारी डॉ. नागरे, वैद्यकिय अधिकारी डॉ. नागदरवाड, वैद्यकिय अधिकारी डॉ. रमेश काकड, तसेच दामीनी पथक फिरदोस पठाण , माया ठोके, ज्योती राठोड, राजू निहाल नायब तहसिलदार, गीता चव्हाण आरोग्य परीवेक्षक राजु पवार क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी ,वैद्यकिय टीम, बिस्मीला सय्यद सहारा सामाजिक विकास संस्था उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्तावीक गणेश अंबोरे यांनी केले तर डॉ. दिलीप गिरी यांनी सुत्रसंचालन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व पक्षीय जयंती उत्सव समितीची रविवारी बैठक

**जालना । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व पक्षीय नागरीक जयंती उत्सव समितीची नूतन कार्यकारिणी निवडण्यासाठी रविवार दिनांक १५ मार्च २०२६ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या सामाजिक न्याय भवनात दुपारी १२ वाजता या बैठकीचे आयोजन

करण्यात आले आहे. या बैठकीत गतवर्षीच्या सर्व पक्षीय नागरीक जयंती उत्सव समितीच्या कार्याचा अहवाल सादर करण्यात येणार असून यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त सर्व पक्षीय नागरीक जयंती उत्सव समितीच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड केली जाणार आहे.

आंबेडकरी चळवळीतील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व पक्षीय नागरीक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रदीप रत्नपारखे व सचिव राज रत्नपारखे व समस्त पदाधिकाऱ्यांनी केले आहे .

# बँकांनी शेतकऱ्यांना तगादा लावून वसुली करू नये - बाबासाहेब वानखेडे

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण बँकेने मार्च एन्डच्या नावाखाली शेतकऱ्यांना सावकारी पध्दतीने वसुलीचा सपाटा लावला असून, अनेक शेतकऱ्यांना नोटीस बजावल्या. यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्येचा विचार येत असून, महाराष्ट्र ग्रामीण बँकेची कर्जवसुली थांबवावी यासाठी महाराष्ट्र शासनाने आदेश द्यावे अशी मागणी माँ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब वानखेडे यांनी केली आहे.



याबाबत मुख्यमंत्र्यांकडे दिलेल्या निवेदनात म्हटले की, यावर्षी जालना जिल्ह्यातील पिके निसर्गाच्या अकृपेने नेस्तानाबुत झाले आहे. सद्या शेतकरी हैराण आहे. याचदरम्यान महाराष्ट्र ग्रामीण बँकेने जालना जिल्ह्यातील अनेक शाखेच्या बँक अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना कर्जासाठी तगादा लावला आहे. तसेच काही बँकांनी न्यायालयाची नोटीस पाठवून , कर्ज वसूलीसाठी रेटा लावला आहे. कर्जाच्या विवंचनेतून अनेक शेतकरी आत्महत्येचा विचार करीत आहे. तरी महाराष्ट्र शासनाने बँकांना यावर्षी तरी कर्ज वसुली करू नये अशा सूचना शासनाने बँकांना द्याव्यात. महाराष्ट्र ग्रामीण बँकेविषयी अनेक शेतकऱ्यांना बाबासाहेब वानखेडे यांच्याकडे समस्या मांडल्या आहेत. तसेच माय-बाप सरकारने शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांना कोर्टात बोलवू नये व न्यायालयाची धमकी देवू नये, यासंबंधी संबंधीत बँकांना आदेश द्याव्यात अशी मागणीही वानखेडे यांनी केली आहे.

# १६ मार्चला महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचे चौथ्या सोमवार आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यासाठी दि. १६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणाऱ्या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करण्याचे आवाहन केले आहे.

अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही.

महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी. तालुका महिला लोकशाही दिनात एका महिन्यांचे आत कार्यवाही न झाल्यास संबंधीत महिला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु शकतील. तालुकास्तरावरील लोकशाही दिनांत अर्जदार महिलेस अंतिम उत्तर शक्य तितक्या लकर जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत देण्याचे बंधन संबंधित अध्यक्ष तथा तहसिलदार व सदस्य सचिव तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहील. महिलांनी तक्रार अर्ज दाखल करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिल कार्यालय व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क करुन या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### ग्रामीण विकासासाठी कार्य करणाऱ्या सौ अश्विनीताई सुधीर पवार यांची राष्ट्रीय महिला परिषदेसाठी निवड

**बदनापूर । प्रतिनिधी -** ग्रामीण विकासासाठी सतत त्याने काम करणाऱ्या आदर्श ढोकसाळ गावाचे सरपंच व बदनापूर विधानसभा प्रमुख भाजपा तसेच महिला मोर्चा चे बदनापूर तालुकाध्यक्ष सौ अश्विनीताई सुधीर पवार यांची नवी दिल्ली येथे केंद्र सरकारतर्फे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय महिला परिषद२०२६ साठी निवड झाल्याबद्दल संपूर्ण बदनापूर तालुक्यातून त्यांचे कौतुक होत आहे सामाजिक व ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमी करण्यासाठी तसेच विविध विकासकमक उपक्रम राबवून समाजात सकारात्मक बदल घडून आणण्यासाटी सौ अश्विनीताई सुधीर पवार यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे त्यांच्या कार्याची दखल घेत केंद्र सरकारने त्यांची या प्रतिष्ठात राष्ट्रीय महिला परिषदेसाठी निवड केली आहे.




# फेरीवाले आणि पथ अन्न विक्रेत्या लघु व्यावसायिकांना गॅस सिलेंडर उपलब्ध करुन द्या

## जालना मनपा शहर पथ विक्रेता समिती सदस्य धनसिंह सूर्यवंशी यांची मागणी

**जालना | प्रतिनिधी -** आखाती युध्दामुळे व्यावसायिक सिलेंडर पुरवठा बंद झाल्यामुळे जालना शहरातील रस्त्यांवर फेरीवाले तसेच अन्न विक्री करणाऱ्या लघु व्यावसायिकांच्या व्यवसायावर विपरित परिणाम झाले असून, त्यांच्या दैनंदिन रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होवून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्याअनुषंगाने जिल्हा प्रशासनाने या लघु व्यावसायिकांना अशा अडचणीच्या परिस्थितीत गॅस सिलेंडर उपलब्ध करुन द्यावे, अशी मागणी जालना शहर महानगरपालिका शहर पथ विक्रेता समिती सदस्य तथा हॉकर्स जॉईंट ॲक्शन कमिटी विभागीय अध्यक्ष धनसिंह सूर्यवंशी यांनी केली आहे.



यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, जालना शहरात रस्त्यांवर अन्न विक्री करणारे लघु व्यावसायिक आणि फेरीवाले पथ अन्न विक्रेते आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक वर्गातील असून, त्यांचा उदरनिर्वाह दररोजच्या कमाईवर अवलंबून असतो. या लघु व्यावसायिकांना व्यावसायिक गॅस सिलेंडर वापरावे लागते. त्यातच सध्याच्या आखाती युध्दामुळे देशभरात व्यावसायिक गॅस सिलेंडरची अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे या लघु व्यावसायिक आणि पथ अन्न विक्रेत्यांचे व्यवसाय अडचणीत आले असून, त्यांच्या दैनंदिन रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याअनुषंगाने ताजे, स्वच्छ आणि किफायतशीर दरातील अन्न नागरिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या विक्रेत्यांच्या अडचणींवर जिल्हा प्रशासनाने लक्ष द्यावे व या लघु व्यावसायिक आणि पथ अन्न विक्रेत्यांना गॅस सिलेंडर पुरवठा करण्यासाठी स्वतंत्रपणे व्यवस्था करण्याची मागणी श्री. सूर्यवंशी यांनी केली आहे. या व्यावसायिकांना गॅस सिलेंडर जिल्हा प्रशासनाने उपलब्ध करुन दिल्यास हे व्यावसायिक त्यांचा दैनंदिन व्यवसाय करतील व त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न सुटू शकेल, असेही त्यांनी शेवटी नमूद केले आहे.

# नमो व पी.एम. किसान सन्मान योजना पेन्शन मध्ये वाढ करा

## भाजपा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाबासाहेब कोलते

**जालना | प्रतिनिधी -** राज्य शासनाच्या नमो किसान सन्मान योजनेमध्ये केंद्र सरकार च्या पी.एम. किसान सन्मान योजनेमध्ये वाढ करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी भाजपा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाबासाहेब कोलते यांनी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

केंद्रीय कृषी मंत्री व मुख्यमंत्री यांना पाठविलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी महाराष्ट्रातील व भारत देशातील सर्व शेतकरी बांधवांसाठी पंतप्रधान किसान सन्मान योजना हि अल्पधारक शेतकऱ्यांसाठी सुरु केली असून देशातील प्रत्येक शेतकऱ्यांना एका वर्षात ६०००/- रुपये म्हणजे प्रत्येकी चार महिन्याला रुपये २०००/- चा हप्ता केंद्र शासनाकडून दिला जातो. केंद्र शासनाच्या धरतीवरच महाराष्ट्र राज्यातील अन्नदाता बळीराजाच्या उत्तपन्न वाढीसाठी नमो शेतकरी महासन्माननिधी योजना तत्कालीन भाजपा शिवसेना महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरु केली होती. परंतु राज्य सरकारने सदर नमो शेतकरी महासन्मान योजनेतील आतापर्यंत ७ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाले असून ८ वा हप्ता दि. १३/०३/२०२६ रोजी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार असल्याचे केंद्र व राज्यशासनाने कळविले आहे.



केंद्र सरकार च्या पी.एम. किसान योजनेचा २२ वा हप्ता आज केंद्र सरकार च्या वतीने शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केला जाणार आहे. राज्य शासनाच्या नमो शेतकरी योजनेमध्ये वार्षिक ६०००/- रु. वाढ करून प्रत्येक वर्षी १२०००/- हजार रु. शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी व केंद्र शासनाच्या पी.एम किसान योजनेचे सुद्धा ६०००/- रु. वाढ करून वर्षाला १२०००/- रु. असे प्रत्येकी राज्य शासनाचे १२०००/- व केंद्र शासनाचे १२०००/- असे एकूण २४०००/- रु. प्रत्येक वर्षाला अल्पभूधारक शेतकऱ्याच्या खात्यावर जमा करावे कारण सद्या महागाई वाढली असून शेतकऱ्यांना खते, बी- बियाणे व शेतकऱ्यांचे इतर आवश्यक लागणारे साहित्य महाग झाल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग त्रस्त आहे. त्यामुळे महागाईच्या जोखंडातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देऊन राज्य शासनाची नमो किसान सन्मान योजने मध्ये वाढ करण्यात यावी तसेच केंद्र शासनाची पी.एम. किसान सन्मान योजना मध्ये वाढ करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे शिफारस करावी अशी मागणी केली आहे.

# रुग्णांची हेळसांड थांबवण्यासाठी नवीन जालना येथे स्वतंत्र डिसीबीओ कार्यालय सुरु करा - सुखलालसिंह राजपूत

**जालना | प्रतिनिधी -** ईएसआयसी योजनेअंतर्गत नोंदणीकृत विमाधारक व्यक्ती () यांना भेडसावणाऱ्या अडचणींसंदर्भात महाराणा ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष सुखलालसिंह राजपूत यांनी डिसीबीओ कार्यालय चे मेडिकल ऑफीसर डॉ. बालाजी बामनपल्ले यांना निवेदन दिले.

महाराणा ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष सुखलालसिंह राजपूत यांच्या नेतृत्वात दिलेल्या निवेदनात म्हटले की, सध्या जालना येथील डिसीबीओ ( दवाखाना व शाखा कार्यालय) कार्यालय जुना जालना येथे कार्यरत आहे; परंतु बहुसंख्य नोंदनिकृत विमा धारक व्यक्तिंचे कुटुंबे नवीन जालना परिसरात वास्तव्यास आहेत. त्यामुळे त्यांना जुना जालना येथे ये-जा करण्यासाठी वेळ, आर्थिक खर्च व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः आजारी रुग्ण, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार वर्गासाठी ही परिस्थिती अत्यंत गैरसोयीची ठरत आहे.

डिसीबीओ कार्यालयाची वेळ सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.०० अशी असली, तरी प्रत्यक्षात डॉक्टर सकाळी ११.०० नंतरच उपस्थित होत असल्याच्या तक्रारी वारंवार प्राप्त होत आहेत. डॉक्टरांनी तपासणी करून औषधपत्र (प्रिस्क्रिप्शन) दिल्यानंतर रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक संबंधित रुग्णालयात तपासण्या करतात. जर रुग्णास भरती करणे आवश्यक ठरले, तर पुन्हा डिसीबीओ कार्यालयात जाऊन प्रवेशासाठी ( ) परवानगी घ्यावी लागते.

मात्र डॉक्टर उशिरा येणे व दुपारी २.०० वाजेपर्यंतच तपासणी करणे यामुळे रुग्णाला रुग्णालयात जाऊन तपासण्या करून पुन्हा डिसीबीओ कार्यालयात परत येणे व सायंकाळी ४.०० पूर्वी परवानगी मिळवणे अत्यंत कठीण होते. परिणामी, गंभीर रुग्णांनाही विलंब सहन करावा लागतो. यापूर्वीही सुमारे अनेक रुग्नानी व रुग्नांच्या नातेवाईकांनी संबंधित कार्यालयास लेखी व तोंडी तक्रारी केल्या आहेत. परंतु संबंधित रुग्णालयाकडून डिसीबीओ आमच्या अखत्यारीत नाही'' असे उत्तर दिले जाते, तर डिसीबीओ कार्यालयाकडून ''तक्रार वरिष्ठांकडे पाठविली आहे'' असे सांगितले जाते; मात्र त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही किंवा पाठपुरावा होताना दिसत नाही.

सदरिल योजनेअंतर्गत रुग्नांना सन्मानपूर्वक, सुलभ व वेळेत सेवा मिळणे अपेक्षित आहे. परंतु जालना येथे रुग्नाना वारंवार दिरंगाई, गैरसोय आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. ही बाब अत्यंत चिंताजनक असुन जुना जालना येथील डिसीबीओ कार्यालय नविन जालना येथे स्थलांतर करावे किंवा नवीन जालना येथे स्वतंत्र डिसीबीओ कार्यालय सुरू करण्यात यावे ज्यामुळे रुग्नांची होणारी हेळसांड थांबेल असे निवेदनात नमुद केले आहे यावेळी निवेदन देतांना कार्तिक मदन पा., सुनिल राजपूत यांची उपस्थिति होती.

# १५ हजारांचे अर्थसहायासाठी दिव्यांग सहाय्यक पोर्टलवर ऑनलाइन अर्जांचे आवाहन

**जालना | प्रतिनिधी -** दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ आणि दिव्यांग धोरण २०१८ मधील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात दिव्यांगांना स्वावलंबी करण्यासाठी राज्य शासनाने पाऊल उचलले आहे. २८ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार, प्रशिक्षित दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी लागणारी साधनसामग्री (टूल किट) खरेदी करण्यासाठी १५ हजार रुपयांपर्यंतचे वित्तीय सहाय्य देण्यात येणार आहे.

तरी पात्र लाभार्थ्यांनी या योजनेसाठी दिव्यांग सहायक पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले आहे. सध्याच्या काळात नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे.

# दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी १६ मार्चपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

**जालना | प्रतिनिधी -** शहरातील दिव्यांगांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या वतीने १६ मार्च २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी तसेच जालना महानगरपालिका प्रशासनाला देण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष राहुल मुळे संस्थापक अध्यक्ष राहुल मुळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिव्यांगांच्या प्रश्नांबाबत अनेक वेळा लेखी निवेदन देऊन तसेच प्रत्यक्ष भेटून चर्चा करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे दिव्यांगांच्या न्याय्य मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जालना शहरातील दिव्यांगांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी.पाणीपट्टी व घरपट्टी करामध्ये ४० टक्के सवलत देण्यात यावी.प्रभाग क्रमांक ९ मधील मस्तानपुरा परिसरात दिव्यांग भवन उभारण्यात यावे. दिव्यांगांना व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी. जालना महानगरपालिकेत दिव्यांगांसाठी स्वतंत्र कार्यालय तळमजल्यावर सुरू करावे.महानगरपालिका कार्यालयात व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध करून द्यावी. छत्रपती संभाजी महाराज उद्यान परिसरातील गाळे दिव्यांगांना भाड्याने देण्यात यावेत.महानगरपालिका



आवारात दिव्यांगांना व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून द्यावी.दरम्यान, या मागण्यांबाबत प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा १६ मार्चपासून सुरू होणाऱ्या आमरण उपोषणाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. आज जिल्हाधिकारी तथा महानगरपालिकेचे आयुक्त अशिमा मित्तल महापौर वदना मगरे उपमहापौर राजेश राऊत यांना निवेदन देण्यात आले आहे येत्या दोन दिवसात दिव्यांगाच्या मागण्या मान्य करा अन्यथा १६ मार्चपासून सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार आहे यानिवेदनावर जिल्हाध्यक्ष राहुल मुळे संस्थापक अध्यक्ष शंकर शिरगुळे शिवसेना दिवस आघाडी जिल्हाध्यक्ष अनिल मगदुले राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी दिव्यांग असेल जिल्हाध्यक्ष सतिष फतपुरे शुभम साबने शेख इस्माईल सगिता कोरडे सुरेश बोर्डे सविता बोराडे रवि तायडे आदींच्या साक्षरी आहेत

# मंठा पोलीस ठाण्यात एसीबीचा सापळा; पोलीस निरीक्षकासह पोलिस अमलदार लाच घेताना जेरबंद

**मंठा | प्रतिनिधी -** अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई न करण्यासाठी लाच मागितल्याच्या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंठा पोलीस ठाण्यात सापळा रचून पोलीस निरीक्षकासह एका पोलिस अमलदाराला रंगेहात पकडले. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

या कारवाईत पोलीस अमलदार रवी गणपत जाधव (वय ३८) आणि पोलीस निरीक्षक मनोज कुमार राठोड (वय ५०) यांना तक्रारदाराकडून ३० हजार रुपये लाच स्वीकारताना पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले.

तक्रारदार हे वाळू वाहतुकीचा टिप्पर चालवित असून त्यांच्या वाहनावर कारवाई न करण्यासाठी आरोपींकडून मासिक ५० हजार रुपयांचा हप्ता मागण्यात आला होता. त्यापैकी १० हजार रुपये आरोपींनी आधीच घेतले होते, तर उर्वरित रक्कम देण्याचे ठरविण्यात आले होते. मात्र तक्रारदारास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार दाखल केली.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर १२ मार्च २०२६ रोजी पंचांच्या उपस्थितीत सापळा कारवाई करण्यात आली. त्यावेळी उर्वरित रकमेबाबत तडजोड होऊन ३० हजार रुपये स्वीकारण्याचे आरोपींनी मान्य केले. मंठा पोलीस ठाण्यातील गोपनीय शाखेत तक्रारदाराकडून ३० हजार रुपये स्वीकारताना सापळा पथकाने दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले.




कारवाईदरम्यान आरोपी रवी जाधव यांच्या अंगझडतीतून ३० हजार रुपयांची लाच रक्कम आणि सॅमसंग कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. तसेच पोलीस निरीक्षक राठोड यांचा मोबाईलही ताब्यात घेण्यात आला असून त्याचे विश्लेषण सुरू आहे. दोन्ही आरोपींच्या घरझडतीची प्रक्रिया सुरू असून मंठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, मंठा तालुक्यात अवैध वाळू उत्खननाचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाल्याची चर्चा आहे. तालुक्यात दररोज लाखो ब्रास वाळूचे अवैध उत्खनन केले जाते. हजारो वाळू माफिया नदीपात्रातून वाळू काढून तिची अवैध विक्री करतात. मंठा तालुक्यात हजारो हायवा व ट्रॅक्टरच्या माध्यमातून ही वाळू वाहतूक केली जाते. स्थानिक पातळीवर या अवैध धंद्यासाठी ठरावीक दराने हप्ते वसूल केले जात असल्याची चर्चा असून पोलीस कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून वसुली होत असल्याच्या तक्रारीही वेळोवेळी समोर येत असतात.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक संतोष तिगोटे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली असून तपास पोलीस उपअधीक्षक बाळू जाधवर करीत आहेत. नागरिकांनी कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाच मागितल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जालन्यात गॅस एजन्सी धारकांची जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांसोबत बैठक

# घरगुती गॅसचा तीन दिवसांचा साठा उपलब्ध, व्यावसायिक सिलेंडर पुरवठा तात्पुरता बंद

## नागरिकांनी संयम राखत नियमित प्रक्रियेनुसारच गॅस बुकिंग करावे, प्रशासनाचे आवाहन

**जालना | प्रतिनिधी -** जालना, दि. १२ (प्रतिनिधी) गेल्या काही दिवसांपासून घरगुती गॅस मिळण्यात अडचणी येत असल्याने ग्राहकांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर आज गुरुवारी जालन्यात गॅस एजन्सी धारकांची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. ही बैठक जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौथर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

गेल्या काही दिवसांत गॅस मिळत नसल्याच्या चर्चेमुळे शहरातील विविध गॅस एजन्सींवर ग्राहकांची मोठी गर्दी झाली होती. बुकिंग होत नसल्याने अनेक ग्राहक त्रस्त झाले होते. या पार्श्वभूमीवर जिल्हा पुरवठा विभागाने एजन्सी धारकांसोबत आढावा बैठक घेऊन परिस्थिती स्पष्ट केली.

बैठकीत सध्या व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा तात्पुरता बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र रुग्णालये, वसतीगृहे आणि अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना गॅस पुरवठा सुरू ठेवण्यात आला आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौथर यांनी सांगितले की, सध्या जिल्ह्यात घरगुती गॅसचा तीन दिवसांचा सुरळीत साठा उपलब्ध असून पुरवठा टप्प्याटप्प्याने सुरू आहे. शहर भागासाठी ३० दिवसांची, तर ग्रामीण भागासाठी ४५ दिवसांची बुकिंग व्यवस्था निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, गॅस एजन्सी संघटनेचे अध्यक्ष आनंद देशमुख यांनीही माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, काही वृत्तवाहिन्यांवर गॅस पुरवठा ठप्प झाल्याच्या बातम्या प्रसारित झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे अनेक जण एकाच वेळी गॅस बुक करण्यासाठी धावपळ



करत आहेत. प्रत्यक्षात घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असून नागरिकांनी घाईगडबड करू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार सध्या गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून परिस्थिती नियंत्रणात आहे. त्यामुळे नागरिकांनी संयम राखत नियमित प्रक्रियेनुसारच गॅस बुकिंग करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित लेखकाचीच असेल.